देशोन्नती

# भारत सरकार शिष्यवृत्ती व विद्यावेतनाची रक्कम प्राप्त करुन घ्या!

## प्राचार्या यांचे आवाहन

**वाशिम** ■ शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम या संस्थेतील शैक्षणिक वर्ष सन २००९-१० पासून ते २०१३-१४ या वर्षात शिक्षण घेतलेल्या माजी मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी पात्रतेनुसार भारत सरकार शिष्यवृत्तीचा, फ्रिशिप व विद्यावेतनचा अर्ज सादर केले होते. संबधीतांचे मंजुर शिष्यवृत्ती, फ्रिशिप व विद्यावेतनाची प्रदान विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक तथा ईतर तांत्रिक अडचणीमुळे शिष्यवृत्तीची, फ्रिशिप व विद्यावेतनची रक्कम त्यांना मिळाली नाही, अशा संबधीत माजी विद्यार्थ्यांनी बँक खाते पासबुकच्या पहिल्या पृष्ठाच्या झेरॉक्स प्रतीवर नोंदणी क्रमाक, शाखा प्रवेशाचे वर्ष व मोबाईल क्रमाक नमूद करुन office.gpwashim@dte maharashtra.gov.in या इ-मेल आयडीवर स्वयंस्वाक्षरी करून ३० दिवसांच्या आत स्कॅन कॉपी सादर करावी. जे विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्ती, फ्रिशिप व विद्यावेतन रक्कम घेऊन गेलेले नाही, अशा विद्यार्थ्यांनी शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम या संस्थेतून ही रक्कम ३० दिवसाच्या आत रोखपाल, शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम यांचेकडे विहीत नमुन्यातील पावती सादर करून रक्कम प्राप्त करुन घ्यावी. विहीत मुदतीत भारत सरकार शिष्यवृत्ती, फ्रिशिप व विद्यावेतनची रक्कम प्राप्त करुन न घेतल्यास त्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील व सदरची रक्कम शासन जमा करण्यात येईल. या मुदतीनंतर कोणत्याही प्रकारची मागणी मान्य केल्या जाणार नाही. असे आवाहन वाशिम येथील शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य यांनी केले आहे.

Washim Edition
Jan 2, 2024 Page No. 3
Powered by : eReleGo.com